Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १४० ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION




» Selected

### अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय :ठाकरे

नागपूर: मनसे विद्यार्थी सेनेच्या सदस्य नोंदणी मोहिमेसाठी नागपूर दौऱ्यावर असलेले मनसे नेते अमित ठाकरे यांनी मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांच्यावर त्यांच्याच आक्रमक शैलीत जोरदार पलटवार केला आहे. राज ठाकरे यांनी अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांच्या मराठी भाषेच्या मुद्द्यावरून भूमिका मांडल्यानंतर, साटम यांनी 'राज ठाकरे यांनी आपल्या नातवाला म्हणजेच अमित ठाकरेंच्या मुलाला मराठीसाठी आधी बालमोहन विद्यालयात दाखल करावे' अशी टीका केली होती. या टीकेला सडेतोड उत्तर देताना अमित ठाकरे म्हणाले की, "अमित साटम यांना भुंकायलाच ठेवलंय. ते काम ते उत्तम करत आहेत. तेच त्यांचं काम आहे". पुढे आपला संताप व्यक्त करताना ते म्हणाले, "अशा लोकांवर मी काय बोलू, ज्यांना स्वतःच्या भाषेचं, राज्याचं काहीच पडलेलं नाही. अमित साटम म्हणजे तोच ना जो लोकांच्या मृत्यूवर हसला. लोकांवर झाड पडून, खड्ड्यात पडून मृत्यू झाले.

## त्रिशूली हायड्रोपॉवरच्या बोगद्यात अडकलेल्या 350 मजूर

# नेपाळ: 392 मृत्यू, 1500 हून अधिक बेपत्ता

## नेपाळच्या महापुरात राज्यातील 114 जण अडकले

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । नेपाळमध्ये आलेल्या अचानक भीषण पुरामुळे मोठी हानी (NEPAL FLOODS) झाली आहे. या जलप्रलयामुळे इमारती, गावच्या गावं, रस्ते आणि पूल वाहून गेले आहेत. या पुरात आतापर्यंत 392 जणांचा मृत्यू झाला असून 1200 हून अधिक लोक बेपत्ता आहेत.**

या घटनेनंतर 290 भारतीय नागरिकांशी संपर्क होऊ शकलेला नाही. त्यांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्रिशूली हायड्रोपॉवरच्या बोगद्यात अडकलेल्या 350 मजूर आणि कर्मचाऱ्यांची नेपाळी लष्कराच्या पथकाने सुखरूप सुटका केली आहे. या जलविद्युत प्रकल्पात अनेक भारतीय मजूरही काम करत होते. बोगद्यात अडकलेल्या सर्व मजुरांना बाहेर काढण्यात नेपाळी लष्कराला यश आले आहे. नेपाळ सरकारच्या प्लॅनेट लॅब्स आणि लँडसॅटच्या उपग्रह छायाचित्रांच्या विश्लेषणातून



समोर आलेल्या अहवालानुसार, रसुवागढी सीमेपासून सुमारे 18 किलोमीटरवर ल्हेंदे नदीचा प्रवाह पूर्णपणे बंद झाला आहे. या अडथळ्यामुळे नदीच्या किनारी भागात तात्पुरत्या स्वरूपाची एक सरोवरसदृश जलराशी तयार झाली आहे. नेपाळ सरकारने याबाबत इशारा जारी केला असून, या नैसर्गिक सरोवराचा बांध फुटल्यास खालच्या भागातील परिसरात अचानक भीषण पूर येण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.नेपाळच्या दुर्घटनेत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांशी मंत्री गिरीश महाजनांनी संवाद साधलाय. नेपाळ टूर्स आणि ट्रॅव्हल्सच्या संचालिका श्रीमती ठक्कर यांच्याशी संवाद साधला. नेपाळच्या तिबेटमध्ये आलेल्या महापुरात महाराष्ट्रातील 114 नागरिक अडकले आहेत, त्यापैकी 53 नागरिक सुखरूप असून मानसरोवर परिसरात असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतीलही अनिल महाजन आणि त्यांचं कुटुंबीय नेपाळमध्ये अडकले आहेत. मात्र एका हॉटेलमध्ये सुखरूप असल्याची माहिती त्यांनी स्वतःच दिली आहे. नेपाळमध्ये अडकलेले नागपूरचे 106 प्रवासी काठमांडूवरून सुखरुप रवाना झालेत. तर ठाण्यातील 9 पर्यटकांशी संपर्क झालेला नाहीय. ठाणे जिल्हा प्रशासन त्यांच्या नातेवाईकांच्या आणि नेपाळ प्रशासनाच्या संपर्कात आहेत. तर रायगडमधील 37 नागरिक अडकल्याची माहिती आहे.लँगटांग लिरुंग पर्वताच्या उत्तर उतारावर सुमारे 5200 मीटर उंचीवर असलेल्या ग्लेशियरचा खालचा भाग तुटून सुमारे 1200 मीटर खाली दरीत कोसळला. त्यामुळे ल्हेंदे खोला नदीत जाऊन पडल्याने नदीचा प्रवाह अडला आणि तिथे तात्पुरता बांध तयार झाला. हा बांध फुटल्यानंतर पाणी, चिखल, दगड आणि मोठ्या प्रमाणात मलब्याची प्रचंड लाट वेगाने खालीच्या दिशेने वाहू लागली.

### मजुरांना बाहेर काढण्यात यश

ल्हेंदे खोला ही तिबेटमधून वाहत येणारी एक उपनदी असून, ती नेपाळ-चीन सीमेवरील रसुवागढी आणि तिमुरे परिसरात भोटेकोशी नदीला मिळते. ग्लेशियर कोसळल्याने किंवा आइस-रॉक एव्हलांच झाल्याने मोठ्या प्रमाणात बर्फ, दगड आणि मलबा ल्हेंदे खोलामध्ये कोसळला. त्यामुळे नदीच्या प्रवाहात अचानक प्रचंड वाढ झाली. या घटनेनंतर 290 भारतीय नागरिकांशी संपर्क होऊ शकलेला नाही. त्यांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्रिशूली हायड्रोपॉवरच्या बोगद्यात अडकलेल्या 350 मजूर आणि बोगद्यात अडकलेल्या सर्व मजुरांना बाहेर काढण्यात नेपाळी लष्कराला यश आले आहे.

## राणाजगजितसिंह पाटलांनी नगरसेवक फोडाफोडीचा बाजार मांडला

### ओमराजे निंबाळकरांच्या बंधुंचा खळबळजनक आरोप

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** शिवसेनेच्या नगरसेवकांची फोडाफोडीवरून जोरदार राजकारण तापलं आहे. एकीकडे भाजपात जाणाऱ्या नगरसेवकांनी रातोरात चक्र फिरवली आणि शिवसेनेत प्रवेश झाला. तर दुसरीकडे या नगरसेवक फोडाफोडींमध्ये वीस लाखांपासून एक कोटीपर्यंत बोली लावली गेल्याचा आरोप खासदार ओमराजे निंबाळकर यांचे बंधू तथा शिवसेना ठाकरे पक्षाचे सहसंपर्कप्रमुख मकरंद राजे निंबाळकर यांनी केला आहे. ओमराजे निंबाळकर आणि राणा जगजितसिंह पाटील यांनी नगरसेवक फोडाफोडीचा बाजार मांडला, असा घणाघात मकरंद राजेनिंबाळकर यांनी केला.दरम्यान, ओमराजे निंबाळकर पैसे घेऊन फुटले, तसेच नगरसेवक फोडले. दम होता तर मशाल चिन्हावर निवडून आलेल्या नगरसेवकांचा राजीनामा घ्यायचा आणि मग निवडून आणायचं. कळंब मधील नगरसेवक राणा जगजितसिंह पाटलांनी फोडले, ओमराजे आणि



राणा पाटलांनी केलेली फोडाफोडी खपवून घेणार नाही. येत्या काळात त्यांना धडा शिकवू, असा निर्धार ठाकरेंच्या शिवसेनेने आता केलाय. नगरसेवक फोडाफोडीनंतर ठाकरेंच्या शिवसेनेची बैठक पार पडली यावेळी शिवसैनिक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे आगामी काळात धाराशिवमधील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.धाराशिवमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात सुरु असलेली गळती काही थांबायचं नाव घेत नाही. अशातच धाराशिवनगर परिषदेच्या पाच नगरसेवकांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला. पक्ष प्रवेशानंतर धाराशिवमध्ये नगरसेवकांच्या विरोधात बॅनर झळकले असून एक कोटींचा गद्दार हा शिक्का पुसायचा नाही, मतदाराला धोका आमचं मत आम्हाला परत द्या, अशा आशयाचे बॅनर धाराशिवमध्ये झळकले आहे. सध्या या बॅनरबाजीची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दरम्यान, या नगरसेवकांच्या पक्षांतरामागे मोठ्या आर्थिक व्यवहाराची चर्चा सामान्य नागरिकांमध्ये सुरू असल्याचं बोललं जात आहे. कोट्यवधी रुपयांची बोली लावून नगरसेवकांची फूट घडवून आणली जात असल्याची कुजबुज शहरात असल्याचा दावा केला जात आहे.

## चुकीच्या डिझाईनमुळे २५० कोटी पाण्यात जाणार

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी:** मुंबईतील अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या 'मेट्रो लाईन ७ ए'च्या कामात प्रशासनाचा आणि सल्लागार कंपन्यांचा अत्यंत निष्काळजीपणा समोर आला आहे. विलेपार्ले पूर्व येथील विमानांच्या उड्डाण आणि लँडिंगचे क्षेत्र असलेल्या 'एअरपोर्ट फनेल झोन'मध्ये बांधण्यात आलेल्या सुमारे १ किलोमीटर लांबीच्या उन्नत पुलाची (एलिव्हेटेड व्हियडक्ट) आणि ओव्हरहेड इलेक्ट्रिक वायरची (ओएचई) उंची भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) ठरवून दिलेल्या सुरक्षेच्या मर्यादेपेक्षा तब्बल २.५ मीटरने अधिक झाली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या पुलाचे आणि 'एअरपोर्ट कॉलनी' स्थानकाचे जवळपास ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, आता या गंभीर चुकीमुळे हे संपूर्ण बांधकाम पाडून नव्याने बांधण्याची नामुष्की 'एमएमआरडीए'वर ओढवली आहे. डिझाईनमधील या अक्षम्य चुकीमुळे जनतेच्या कररूपातील तब्बल २५० कोटी रुपये अक्षरशः पाण्यात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. २०२२ मध्ये या प्रकल्पासाठी विमानतळ प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेताना मेट्रोच्या सल्लागार कंपनीने ओव्हरहेड वायरसाठी लागणाऱ्या अतिरिक्त उंचीचा आराखड्यात विचारच केला नसल्याचे आता उघडकीस आले आहे. विमानांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असल्याने



विमानतळ प्राधिकरणाने या अतिरिक्त उंचीला अद्याप परवानगी दिलेली नाही. जर यावर तातडीने कोणताही तांत्रिक तोडगा निघाला नाही, तर हे बांधकाम पाडण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय प्रशासनाकडे उरणार नाही. मुळात २०२१ मध्येच पूर्ण होणे अपेक्षित असलेली ही ३.४ किलोमीटरची महत्त्वपूर्ण मेट्रो मार्गिका आता या बेजबाबदार कारभारामुळे २०२६-२७ नंतरही रखडण्याची चिन्हे आहेत. अधिकाऱ्यांच्या या बेफिकिरीमुळे केवळ आर्थिक नुकसानच होणार नाही, तर प्रवाशांनाही आणखी काही वर्षे गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे. मुंबईतील अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या 'मेट्रो लाईन ७ ए'च्या कामात प्रशासनाचा आणि सल्लागार कंपन्यांचा अत्यंत निष्काळजीपणा समोर आला आहे. विलेपार्ले पूर्व येथील विमानांच्या उड्डाण आणि लँडिंगचे क्षेत्र असलेल्या 'एअरपोर्ट फनेल झोन'मध्ये बांधण्यात आलेल्या सुमारे १ किलोमीटर लांबीच्या उन्नत पुलाची (एलिव्हेटेड व्हियडक्ट) आणि ओव्हरहेड इलेक्ट्रिक वायरची (ओएचई) उंची भारतीय विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) ठरवून दिलेल्या सुरक्षेच्या मर्यादेपेक्षा तब्बल २.५ मीटरने अधिक झाली आहे.


### आयुक्तांच्या दौऱ्यापूर्वीच फेरीवाल्यांवर कारवाई

मुंबई : भांडुप रेल्वे स्थानक वाहतूक कोंडी सोडविण्यासह पादचाऱ्यांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी 'अर्बन डिझायनर'च्या माध्यमातून वाहतूक आराखडा तयार करण्याच्या सूचना मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिल्या आहेत, आयुक्तांनी भांडुप स्टेशन रोड परिसराची पाहणी करून 'पादचारी प्रथम' अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांचाही आढावा घेतला. भांडुप रेल्वे स्थानक परिसरात बेस्ट बससाठी सुरक्षित मार्गिका उपलब्ध व्हावी, वाहतूक कोंडी कमी व्हावी तसेच पादचाऱ्यांना अडथळामुक्त रस्ता मिळावा, यासाठी आयुक्त अश्विनी भिडे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

## टॅक्सी चालकांना वर्षभर 'मायमराठी'ला फाट्यावर मारण्याची मुभा!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यातील अमराठी टॅक्सी आणि रिक्षाचालकांना जुजबी संवादात्मक मराठी भाषा शिकण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. शिवाय, या वर्षभराच्या कालावधीत त्यांच्यावर शासनाकडून कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असा मोठा दिलासाही दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटातील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी फिरवल्याने त्याबाबत आता राजकीय वर्तुळात वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. सरनाईक मराठी सक्तीच्या मुद्द्यावर अत्यंत



आग्रही आणि आक्रमक होते. मात्र, भाजपचा अमराठी मतदार वर्ग नाराज होण्याची शक्यता तसेच आगामी उत्तर प्रदेश निवडणुका हे यामागील प्रमुख कारण असल्याची चर्चा सुरू झाली आहे. शिंदे आणि सरनाईक यांच्यासाठीही हा मोठा धक्का असून यामुळे महामुंबईतील मराठी माणूस नाराज होण्याची शक्यता आहे. हाजी अराफत यांच्या नेतृत्वाखालील ऑटोरिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन शासनाच्या या नियमाला आपला पूर्ण पाठिंबा दर्शवला. मात्र, चालकांच्या वयातील भिन्नतेमुळे भाषा शिकण्यासाठी पुरेसा वेळ देण्याची विनंती केली होती. चालकांच्या या सकारात्मक प्रतिसादाची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ही सवलत जाहीर केली असून, या एका वर्षाच्या वाढीव काळात संघटना स्वतः पुढाकार घेऊन चालकांसाठी मराठी भाषेचे विशेष वर्ग आयोजित करून त्यांना भाषा शिकवणार आहेत. या महत्त्वाच्या निर्णयामुळे हजारो अमराठी चालकांचा रोजगार सुरक्षित राहण्यासोबतच, प्रवाशांशी संवाद सुलभ होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या मराठी भाषेचे ज्ञान विनादबाव आत्मसात करण्यासाठी त्यांना आता योग्य अवधी मिळाला आहे, असे भाजपच्या गोटातून सांगितले जात आहे. शिवसेना शिंदे गटाकडून यावर अजून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

राज्यातील अमराठी टॅक्सी आणि रिक्षाचालकांना जुजबी संवादात्मक मराठी भाषा शिकण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. शिवाय, या वर्षभराच्या कालावधीत त्यांच्यावर शासनाकडून कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असा मोठा दिलासाही दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटातील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी फिरवल्याने त्याबाबत आता राजकीय वर्तुळात वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. सरनाईक मराठी सक्तीच्या मुद्द्यावर अत्यंत आग्रही आणि आक्रमक होते. मात्र, भाजपचा अमराठी मतदार वर्ग नाराज होण्याची शक्यता तसेच आगामी उत्तर प्रदेश निवडणुका हे यामागील प्रमुख कारण असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## भेसळीवर तडजोड नाही'; तुकाराम मुंढेंनी दिला स्पष्ट इशारा

### सणासुदीतील खाद्य व्यवसायांबाबत एफडीएची भूमिका स्पष्ट

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** अन्नाच्या गुणवत्तेला जात, धर्म, व्यवसाय किंवा ठिकाणाची सीमा नसते. त्यामुळे गणेशोत्सवातील महाप्रसाद असो, रस्त्यावरील खाद्यपदार्थ असो किंवा पंचतारांकित हॉटेलमधील जेवण, अन्न सुरक्षा नियम सर्वांसाठी समान आहेत. अन्नातील भेसळीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. मुंबई प्रेस क्लबच्या वतीने आयोजित वार्तालाप कार्यक्रमात मुंढे यांनी अन्न सुरक्षा, खाद्यतेल, रेस्टॉरंट, शाळांमधील खाद्यपदार्थ, औषध विक्री, रक्तपेढ्या आणि सणासुदीतील खाद्य व्यवसायांबाबत एफडीएची



भूमिका स्पष्ट केली. महाराष्ट्रात सुटे खाद्यतेल विक्रीला परवानगी नसल्याचे सांगताना हा निर्णय कोणत्याही विशिष्ट समाजाला लक्ष्य करण्यासाठी घेतलेला नसल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले. २०११ पासून यासंदर्भात नियम असून महाराष्ट्राला देण्यात आलेली सवलत २०२० नंतर वाढविण्यात आलेली नाही. त्यामुळे केंद्राच्या नियमांनुसार सुटे खाद्यतेल विक्रीला परवानगी नसल्याचे त्यांनी सांगितले. एफडीएकडे गेल्या तीन महिन्यांत सुमारे १६ हजार तक्रारी प्राप्त झाल्या असून, जुलैअखेरपर्यंत तीन हजारांहून अधिक खाद्य व्यवसायांची तपासणी करण्यात आली. कारवाईत १६५ परवाने निलंबित, तर ७५० हून अधिक आस्थापनांना सुधारणा नोटिसा देण्यात आल्या. त्रुटी दूर केल्यानंतर पुनर्तपासणी करून नियमांचे पालन झाल्यास निलंबन उठवले जाते, अन्यथा परवाना रद्द करण्याची कारवाईही होण्याची शक्यता असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. रेस्टॉरंट्सकडून स्वतःहून सुधारणा आणि किचनचे नूतनीकरण केले जात आहे.ठराविक कालावधीनंतर स्वतःहून किचन बंद ठेवून स्वच्छता आणि सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. खाद्य आस्थापनांमध्ये झुरळे आढळल्यानंतर काही व्यावसायिकांकडून विचित्र कारणे दिली जातात. मात्र, कारणांपेक्षा प्रत्यक्ष पुरावे आणि नियमांचे पालन महत्त्वाचे असल्याचे मुंढे यांनी सांगितले. खाद्यपदार्थांचे रंग आणि दुधाच्या चवीत बदल झाल्याचे नागरिकांचे म्हणणे नागरिकांच्या आहे. प्रतिक्रियांसाठी भविष्यात औपचारिक फीडबॅक यंत्रणा उभारण्याचा विचार आहे. एफडीएचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नाही,' असेही आयुक्त मुंढे यांनी स्पष्ट केले.

### फीडबॅक यंत्रणा उभारण्याचा विचार

अन्नाच्या गुणवत्तेला जात, धर्म, व्यवसाय किंवा ठिकाणाची सीमा नसते.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. मुंबई प्रेस क्लबच्या वतीने आयोजित वार्तालाप कार्यक्रमात मुंढे यांनी अन्न सुरक्षा, खाद्यतेल, रेस्टॉरंट, शाळांमधील खाद्यपदार्थ, औषध विक्री, रक्तपेढ्या आणि सणासुदीतील खाद्य व्यवसायांबाबत एफडीएची भूमिका स्पष्ट केली.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ
संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!



# म्हसावद रेल्वे उड्डाणपुलाच्या पूर्णत्वाचा मार्ग मोकळा; पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

## २५ कोटींचा प्रकल्प आता ४५.८२ कोटींचा; वाढीव २०.८२ कोटींच्या निधीचा मार्ग मोकळा

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/जळगाव । प्रतिनिधी:** जळगाव तालुक्यातील म्हसावद रेल्वे उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामाला आता गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सन २०२० मध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नातून या प्रकल्पाला २५ कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली होती. आतापर्यंत पुलाचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामासाठी निधी अपुरा पडत असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता होती. गेल्या सहा महिन्यांपासून शासनस्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, या प्रकल्पाची सुधारित किंमत आता ४५ कोटी ८२ लाख रुपये झाली आहे. त्यामुळे मूळ मंजूर रकमेच्या तुलनेत २० कोटी ८२ लाख रुपयांच्या वाढीव खर्चाचा मार्ग मोकळा झाला आहे. व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी या प्रस्तावासाठी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ५ ऑगस्ट रोजी मुंबई येथे झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत म्हसावद रेल्वे उड्डाणपुलाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १९ ऑगस्ट रोजी संबंधित विभागाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे उड्डाणपुलाच्या उर्वरित कामासाठी आवश्यक असलेला महत्त्वाचा



प्रशासकीय टप्पा पूर्ण झाला आहे. रेल्वे फाटकाचा रोजचा खोळंबा सुटणार म्हसावद व परिसरातील नागरिकांसाठी हा उड्डाणपूल केवळ दळणवळणाचा प्रकल्प नसून शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन प्रवासाशी जोडलेला महत्त्वाचा दुवा आहे. रेल्वे फाटक बंद झाल्यानंतर वाहनांच्या लागणाऱ्या लांबच लांब रांगा, वाहतुकीचा खोळंबा तसेच शेतमाल घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांना होणारा विलंब, हा गेल्या अनेक वर्षांपासूनचा प्रश्न आहे. उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर या समस्येपासून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्याची अपेक्षा आहे. 'निधीअभावी प्रकल्प रखडू नये यासाठी पाठपुरावा' याबाबत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, म्हसावद परिसरातील शेतकरी व नागरिकांचा रेल्वे फाटकावरील रोजचा खोळंबा कायमचा कमी व्हावा, या उद्देशाने उड्डाणपुलाला मंजुरी मिळवून देण्यात आली. सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर केवळ निधीअभावी प्रकल्प रखडू नये, यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. वाढीव खर्चाचा मार्ग मोकळा झाल्याने आता उर्वरित कामाला गती देऊन उड्डाणपूल लवकरात लवकर नागरिकांच्या सेवेत आणण्यासाठी पाठपुरावा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. शेतमाल वाहतुकीलाही मिळणार चालना उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर म्हसावदसह परिसरातील गावांची दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे. विशेषतः शेतमालाची वाहतूक सुलभ होण्याबरोबरच नागरिकांना सुरक्षित आणि अखंड प्रवासाचा लाभ मिळणार असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.जळगाव तालुक्यातील म्हसावद रेल्वे उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामाला आता गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सन २०२० मध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रयत्नातून या प्रकल्पाला २५ कोटी रुपयांची मूळ प्रशासकीय मान्यता मिळाली होती. आतापर्यंत पुलाचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित कामासाठी निधी अपुरा पडत असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता होती. गेल्या सहा महिन्यांपासून शासनस्तरावर सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, या प्रकल्पाची सुधारित किंमत आता ४५ कोटी ८२ लाख रुपये झाली आहे. त्यामुळे मूळ मंजूर रकमेच्या तुलनेत २० कोटी ८२ लाख रुपयांच्या वाढीव खर्चाचा मार्ग मोकळा झाला आहे. व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीत निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी या प्रस्तावासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

# अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा महसूल पथकाच्या ताब्यात



जन सम्राट टाईम्स


**नांद्रा (ता. पाचोरा)| प्रतिनिधी :** मौजे कुरंगी येथून अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा हायवा ट्रक महसूल विभागाच्या पथकाने खेडगाव-नांदिचे परिसरात पकडून ताब्यात घेतला. तपासणीदरम्यान सदर वाहनातून वाळू वाहतूक होत असल्याचे आढळून आल्याने महसूल पथकाने तत्काळ कारवाई केली. पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी ताब्यात घेतलेला हायवा ट्रक पाचोरा तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे. वाहनाच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत असून, नियमांनुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याची माहिती महसूल विभागाकडून देण्यात आली. महसूल पथकाची धडक कारवाई ही कारवाई पथक प्रमुख नायब तहसीलदार विनोद कुमावत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी आर. डी. पाटील, ग्राम महसूल अधिकारी दीपक दवंगे, शिवाजी डोंगरे, लहू कोळेकर, महसूल सहाय्यक गोपाल पाटील आणि ईश्वर पाटील यांनी सहभाग घेतला. अवैध वाळू वाहतुकीवर महसूल विभागाचे लक्ष पाचोरा तालुक्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर महसूल विभागाकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नियमांचे उल्लंघन करून वाळू वाहतूक करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे महसूल विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, ताब्यात घेण्यात आलेल्या हायवा वाहनाची कागदपत्रे व वाळू वाहतुकीसंदर्भातील परवानगी तपासल्यानंतर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# अंगणवाडी भरती वादाच्या भोवऱ्यात

## स्थानिक महिलांना डावलल्याचा आरोप



जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** यावल येथील अंगणवाडी भरती प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिक पात्र महिला उमेदवारांना डावलून बाहेरील गावातील उमेदवाराला प्राधान्य दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण भरती प्रक्रियेची जिल्हास्तरावर सखोल चौकशी करून चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे यावल तालुकाध्यक्ष तथा सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश पांडुरंग अडकमोल यांनी तक्रारीद्वारे केली आहे. १३ ऑगस्टला प्रथम यादी जाहीर यावल येथील अंगणवाडी भरतीची प्रथम यादी १३ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर करण्यात आली. या यादीमध्ये स्थानिक महिलांना डावलून बाहेरील गावातील महिलेचे नाव प्रथम क्रमांकावर आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक पात्र महिला उमेदवारांवर अन्याय होत असल्याचा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. पारदर्शकता राखण्यासाठी जाहीर झालेल्या यादीतील सर्व उमेदवारांचे अर्ज, मूळ कागदपत्रे आणि पात्रता निकषांची जिल्हास्तरावर सखोल पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी अडकमोल यांनी केली आहे. तसेच उमेदवारांना देण्यात आलेले गुण नियमानुसार आणि योग्य आहेत की नाहीत, याचीही तपासणी करावी. संपूर्ण प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी झाल्यानंतरच पुढील कार्यवाही करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. भरती स्थगित न केल्यास आंदोलनाचा इशारा जिल्हास्तरावर अर्ज व कागदपत्रांची छाननी पूर्ण होईपर्यंत अंगणवाडी भरती प्रक्रिया स्थगित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सतीश अडकमोल यांनी दिला आहे. दरम्यान, तक्रारीची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी आणि पात्र स्थानिक उमेदवारांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिक पात्र महिला उमेदवारांना डावलून बाहेरील गावातील उमेदवाराला प्राधान्य दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण भरती प्रक्रियेची जिल्हास्तरावर सखोल चौकशी करून चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे यावल तालुकाध्यक्ष तथा सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश पांडुरंग अडकमोल यांनी तक्रारीद्वारे केली आहे. १३ ऑगस्टला प्रथम यादी जाहीर यावल येथील अंगणवाडी भरतीची प्रथम यादी १३ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर करण्यात आली.

# वनविभागाच्या जमिनीवर मक्याच्या आड गांजाची शेती!

## थाळनेर पोलिसांचा छापा ; ३७४ किलो गांजा जप्त

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर, धुळे। प्रतिनिधी:** शिरपूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात वनविभागाच्या जमिनीवर मक्याच्या पिकाच्या आड गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. थाळनेर पोलिसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई करत गांजाची शेती उद्ध्वस्त केली. या कारवाईत ३७४ किलो गांजा, अंदाजे ९३ लाख ५० हजार रुपये किमतीचा, जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी रवींद्र खुमसिंग पावरा (रा. महादेव, ता. शिरपूर) याच्याविरुद्ध थाळनेर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तो फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मक्याच्या पिकाच्या आड गांजाची लागवड शिरपूर तालुक्यातील थाळनेर परिसरातील जमाईपाडा या अतिदुर्गम भागात वनविभागाच्या जमिनीवर मक्याच्या पिकाच्या आड गांजाची शेती करण्यात येत असल्याची गोपनीय माहिती थाळनेर पोलिसांना



मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी पथक तयार केले आणि संबंधित ठिकाणी छापा टाकला. कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणावर गांजाची झाडे आढळून आली. पोलिसांनी ही शेती उद्ध्वस्त करून ३७४ किलो गांजा जप्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ९३ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. गांजा लागवडीचे नेटवर्क शोधण्याची मागणी शिरपूर तालुक्यात यापूर्वीही जिल्हा पोलीस दलाच्या वतीने गांजाची शेती उद्ध्वस्त करण्याच्या अनेक कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामुळे या परिसरात अमली पदार्थांची बेकायदेशीर लागवड नेमकी किती प्रमाणात सुरू आहे, याचा सखोल तपास करण्याची गरज व्यक्त होत आहे. वनविभागाच्या जमिनीवर अशा प्रकारे अमली पदार्थांची लागवड होत असल्याने पोलीस, वनविभाग आणि कृषी विभागाने संयुक्तपणे सर्वेक्षण व कारवाई करून बेकायदेशीर गांजा लागवड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. थाळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षल पाटील, पोलीस अंमलदार चतरसिंग खसावद, उमाकांत वाघ, विजय पाटील, अनिकेत साळुंखे, विनोद पावरा, रवींद्र कोकणी, आकाश साळुंखे, केशव जाधव, कैलास महाजन तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे देवेंद्र ठाकूर, गुलाब पाटील आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

# बिडकीनमध्ये ईद-ए-मिलादुन्नबीचा जुलूस उत्साहात व शांततेत संपन्न!

## ठिकठिकाणी गोड भात व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

जन सम्राट टाईम्स

**बिडकीन (प्रतिनिधी):** सालाबादप्रमाणे यंदाही बिडकीन शहरात ईद-ए-मिलादुन्नबीचा जुलूस मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि शांततेत पार पडला. बुधवारी सकाळी ८ वाजता नुरानी मस्जिद येथे कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर मदिना मस्जिद, बसस्थानक येथून जुलूस काढण्यात आला. जुलूसमध्ये शहरातील नागरिक, तरुण तसेच लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विविध मार्गांवरून जुलूसाची मिरवणूक मदिना मस्जिद बसस्थानक येथून निघालेला जुलूस सादत चौक, हवालदार गल्ली, बागवान गल्ली, बिडकीन ग्रामपंचायत, बसस्थानक आणि शेकटा फाटा मार्गे पुन्हा नुरानी मस्जिद येथे पोहोचला. याठिकाणी जुलूसाची सांगता करण्यात आली. जुलूसाच्या मार्गावर ठिकठिकाणी गावातील तरुणांच्या वतीने सहभागी नागरिकांसाठी गोड भात, गोड शिरा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

ग्रामपंचायत सदस्य मिनाजभाई



ईनामदार यांच्या वतीने जुलूसात सहभागी नागरिकांना फेटे बांधण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नातख्वानांच्यासय्यद शहबाज रजा आणि सय्यद अब्दुल रहमान यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. जुलूसाच्या नियोजनासाठी नुरानी मस्जिद कमिटी आणि मदिना मस्जिद कमिटी यांच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात आले. धार्मिक वातावरणासोबतच शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राहावा, यासाठी नागरिकांनीही सहकार्य केले. मान्यवरांसह नागरिकांची मोठी उपस्थिती यावेळी जिल्हा परिषद सदस्य मनोज पाटील पेरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष तमिजुद्दीन ईनामदार, पंचायत समिती सदस्य लतीफ कुरेशी, ग्रामपंचायत सदस्य मेहमुद शहा, कौसर मिर्झा, काझी मुनिरोददीन, सय्यद असलम, आसिफ पठाण, शौकत सय्यद, शौकत पठाण, आजम शेख, फेरोज शेख, सद्दाम ईनामदार, अफसर शेख, लियाकत पठाण, जाहीर पठाण, अख्तर शहा, शेख अनसर सर, फेरोज ईनामदार, शफीक शेख, गौस सय्यद, महेबुब पठाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच मौलाना निजाम ईनामदार, मौलाना तारिक अन्वर, हाफिज आमीर, हाफिज वसीम, हाफिज इम्रान खान, फारुख सय्यद, शेख शब्बीरभाई, हाफिज ईनामदार, सद्दाम पटेल आणि अनिस पठाण यांच्यासह बिडकीन शहरातील सर्व स्तरातील नागरिक आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधन साजरे; कामगार विभागाचा स्तुत्य उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** बहिण-भावाच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाचा सण धुळे येथे सामाजिक बांधिलकी जपत अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. भाजपा कामगार विभागाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि सुरक्षारक्षकांसोबत रक्षाबंधन साजरे केले. यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना राखी बांधून औक्षण केले, तर कर्मचाऱ्यांनीही महिला भगिनींच्या रक्षणाची ग्वाही दिली. रक्षाबंधनाच्या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधते आणि भाऊ तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. याच पवित्र भावनेला सामाजिक सेवेची जोड देत भाजपा कामगार विभागाच्या वतीने भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर, ब्रदर्स, सुरक्षारक्षक तसेच रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांना राखी बांधण्यात आली. अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता



आरोग्य सेवेत कार्यरत असलेले डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचारी दिवस-रात्र रुग्णांची सेवा करत असतात. त्यांच्या या सेवाभावी कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रक्षाबंधनाच्या माध्यमातून त्यांच्याशी आपुलकीचे नाते जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

भाजपा कामगार विभागाच्या महिला जिल्हाध्यक्षा नेहा अहिरराव आणि भाजपा कामगार विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष विजय पवार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. हिरे वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना राखी बांधून आणि औक्षण करून रक्षाबंधनाचा उत्सव साजरा करण्यात आला. महिला भगिनींच्या रक्षणाची ग्वाही राखी बांधल्यानंतर अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांनीही महिला भगिनींच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर राहण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे रक्षाबंधनाच्या पारंपरिक भावनेसोबतच परस्पर सन्मान, सुरक्षितता, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यावेळी भाजपा कामगार विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष विजय पवार, महिला जिल्हाध्यक्षा नेहा अहिरराव, प्रीती परदेशी, संगीता पाटील, माधुरी भावसार, भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुरक्षा विभागाचे प्रमुख किशोर सोनवणे, तसेच अंकुश बडगुजर, राज गवळे यांच्यासह भाजपा कामगार विभागाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर नशिराबाद बसथांब्यावर महिलांची गैरसोय

## बसेस थांबत नसल्याची तक्रार; एसटीने अतिरिक्त फेऱ्या व नियमित थांबा देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर जळगाव व भुसावळकडे जाणाऱ्या महिला प्रवाशांची नशिराबाद बसथांब्यावर मोठी गैरसोय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. नशिराबाद येथील बसथांब्यावर काही एसटी बसेस नियमितपणे न थांबता उड्डाणपुलावरून थेट पुढे जात असल्याने प्रवाशांना बस मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याची तक्रार आहे. विशेषतः रक्षाबंधनासाठी माहेरी जाणाऱ्या महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने एसटी महामंडळाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे. रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सण असल्याने या काळात मोठ्या संख्येने महिला आपल्या माहेरी जातात. नशिराबाद परिसरातून जळगाव तसेच भुसावळकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. मात्र, बसथांब्यावर प्रतीक्षा करूनही काही बसेस न थांबता उड्डाणपुलावरून पुढे जात असल्याने प्रवाशांची धावपळ होत आहे. बस येईल या अपेक्षेने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांसह प्रवास करणारे नागरिक बसथांब्यावर ताटकळत उभे राहतात. बस न थांबता निघून गेल्यानंतर पुढील बसची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे वेळेचा अपव्यय होण्याबरोबरच सामानासह प्रवास करणाऱ्या महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. राज्य शासनाकडून महिलांसाठी



विविध योजना राबविल्या जात असताना प्रत्यक्ष प्रवासाच्या वेळी महिलांना नियमित सार्वजनिक बससेवेचा लाभ मिळत नसेल, तर या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याची भावना प्रवाशांमधून व्यक्त होत आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर महिलांना सुरक्षित, सुलभ आणि नियमित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देणे हीच खरी भेट ठरेल, अशी अपेक्षा महिला प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. नशिराबाद बसथांब्यावरून जळगाव व भुसावळच्या दिशेने जाणाऱ्या बसेसना थांबा देण्याचे स्पष्ट निर्देश चालक-वाहकांना द्यावेत. तसेच प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त बसफेऱ्यांचे

### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करावी

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर महिलांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नशिराबाद बसथांब्याची तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात. जळगाव व भुसावळकडे जाणाऱ्या बसेसना नशिराबाद येथे योग्य थांबा देऊन महिला प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी तरी महिलांना बससेवेच्या गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, यासाठी एसटी महामंडळाने तातडीने निर्णय घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा नशिराबाद परिसरातील प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

नियोजन करावे, अशी मागणी होत आहे. बसथांब्यावर गर्दी वाढल्यास प्रवाशांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी एसटी महामंडळाने आवश्यक कर्मचारी नियुक्त करावेत, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. वाहतुकीचा वेळ वाचविण्यासाठी उड्डाणपुलाचा वापर केला जात असला, तरी त्यामुळे स्थानिक प्रवाशांची गैरसोय होऊ नये, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. नशिराबाद येथे अधिकृत बसथांबा असल्यास कोणत्या बसेस येथे थांबणार आणि कोणत्या बसेस उड्डाणपुलावरून पुढे जाणार, याबाबत स्पष्ट माहिती व वेळापत्रक प्रवाशांना उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आहे.

# मृत्यूच्या दाढेतून महिलेने कागदावर रक्ताने लिहिले मारेकऱ्याचे नाव!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** गळा चिरलेला असताना, रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या महिलेने मृत्यूशी झुंज देत आपल्या शेवटच्या श्वासांसोबत कागदावर लिहिले, "माझा पतीच माझा मारेकरी आहे." चंडीगडजवळील पिंजोर भागात बुधवारी सकाळी ही काळीज पिळवटून टाकणारी थरारक घटना घडली. राजिंदर कौर (वय ४२) असे मृत महिलेचे नाव आहे.पंचकुला येथील राजिंदर कौर यांचे अब्दुलपूर कॉलनीत स्वतःचे बुटीक होते. बुधवारी सकाळी त्या बुटीकचे शटर वर उचलून बाहेर आल्या. त्यांच्या गळ्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. त्या पुन्हा बुटीकमध्ये गेल्या. काही सेकंदांतच गळ्याला हात लावून मदतीची याचना करत बाहेर आल्या. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी एकत्र येत त्यांना तातडीने कालका रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज तपासले असता, एक संशयित व्यक्ती बुटीकमध्ये शिरून शटर खाली ओढताना दिसली. काही वेळातच तो बाहेर पडला आणि शटर आतून सहज उघडता येऊ नये अशा रीतीने घट्ट बंद करून निघून गेला. तो निघून गेल्यानंतर अवघ्या दोन-तीन मिनिटांत राजिंदर कौर यांनी अत्यंत धडपडत शटर वर उचलल्याचेही सीसीटीव्हीत कैद झाल्याचे स्पष्ट झाले.घटनास्थळी पोलिसांना रक्ताने माखलेला एक कागद सापडला. ग्राहकांच्या कपड्यांची मापे लिहिलेल्या याच कागदावर राजिंदर कौर यांनी हिंदी भाषेत आपल्या पतीचे नाव हत्यारा म्हणून लिहून ठेवले होते. याशिवाय, सासू, दोन नणंदा आणि मेहुणा हेदेखील आपल्या मृत्यूला कारणीभूत असल्याचे त्यांनी या चिठ्ठीत नमूद केले आहे.

# बेटावद येथे भव्य रक्तदान शिबिर; ८१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

## ईदचे औचित्य साधत मुस्लिम पंच कमिटीचा सामाजिक उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**बेटावद । प्रतिनिधी :** जश्ने-ए-ईद मिलादुन्नबी या पवित्र सणाचे औचित्य साधून मुस्लिम पंच कमिटी, बेटावद यांच्या वतीने बुधवार, २६ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. मदरसा अशरफिया, मुस्लिम मोहल्ला परिसरात सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत झालेल्या या शिबिराला तरुणांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सामाजिक उपक्रमात एकूण ८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पैगंबर हजरत मोहम्मद साहेब यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत मुस्लिम पंच कमिटीने या उपक्रमाचे आयोजन केले. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळावी आणि समाजात मानवतेचा संदेश पोहोचावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांच्या हस्ते उद्घाटन रक्तदान शिबिराचे उद्घाटन नरडाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी ईद-ए-मिलादुन्नबीसारख्या पवित्र सणाचे औचित्य साधून रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले.'रक्तदान हेच श्रेष्ठदान असून, एका व्यक्तीच्या



रक्तदानामुळे गरजू रुग्णाचा जीव वाचण्यास मदत होऊ शकते,' असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले. ८१ रक्तदात्यांचे रक्तदान शिबिरात बेटावद व परिसरातील तरुण तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. एकूण ८१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तसंकलनाचे कार्य श्री छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्था, वरद रक्त केंद्र,गुणवंत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पथकाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले. रक्तदानातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश या शिबिराला हिंदू समाजातील बांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनीही आवर्जून भेट दिली. त्यांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत रक्तदानासारख्या मानवतावादी उपक्रमाचे कौतुक केले. विविध समाजघटकांनी एकत्र येत सामाजिक कार्याला दिलेला हातभार हा बेटावदच्या सामाजिक एकतेचे आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सुंदर उदाहरण ठरला. आयोजकांचे विशेष परिश्रम रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी मुस्लिम पंच कमिटी आणि मुस्लिम समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले. बेटावद व परिसरातील सर्वधर्मीय मान्यवरांनी शिबिराला भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले. धार्मिक सणाला सामाजिक सेवेची जोड देत राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.जश्ने-ए-ईद मिलादुन्नबी या पवित्र सणाचे औचित्य साधून मुस्लिम पंच कमिटी, बेटावद यांच्या वतीने बुधवार, २६ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. मदरसा अशरफिया, मुस्लिम मोहल्ला परिसरात सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत झालेल्या या शिबिराला तरुणांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सामाजिक उपक्रमात एकूण ८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पैगंबर हजरत मोहम्मद साहेब यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत मुस्लिम पंच कमिटीने या उपक्रमाचे आयोजन केले.गरजू रुग्णांना मदत मिळावी आणि समाजात मानवतेचा संदेश पोहोचावा, हा या उपक्रमामागील उद्देश होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांच्या हस्ते उद्घाटन रक्तदान शिबिराचे उद्घाटन नरडाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांच्या हस्ते करण्यात आले.

# प्लास्टिकला सुयोग्य पर्याय आणि 'पुनर्वापरयोग्य' प्लास्टिक उत्पादनाचा कायदा ही काळाची गरज!

## नद्यांमधील वाढता प्लास्टिक कचरा चिंताजनक; उत्पादक-विक्रेत्यांवर कठोर जबाबदारी

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** प्लास्टिकचा वाढता वापर आणि त्यातून निर्माण होणारा कचरा ही आजच्या काळातील गंभीर पर्यावरणीय समस्या बनली आहे. प्लास्टिकला टिकाऊपणा, विविध प्रकारच्या वापरातील उपयुक्तता आणि स्वस्त किंमत यामुळे मोठी मागणी आहे. त्यामुळे प्लास्टिकचा वापर केवळ जनजागृतीच्या माध्यमातून पूर्णपणे थांबवणे व्यावहारिकदृष्ट्या कठीण आहे. त्यासाठी प्लास्टिकला सक्षम पर्याय उपलब्ध करून देण्यासोबतच केवळ पुनर्वापरयोग्य प्लास्टिकच्या उत्पादनाला कायदेशीर प्रोत्साहन व सक्ती करणे आवश्यक असल्याचे मत पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी व्यक्त केले. २६ ऑगस्ट २०२६ रोजी 'दि गार्डियन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालाचा संदर्भ देताना गाडगीळ यांनी महासागरातील प्लास्टिक प्रदूषणाची गंभीरता अधोरेखित केली. जागतिक महासागर स्वच्छता मोहिमेदरम्यान मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकच्या बाटल्या, बाटल्यांची झाकणे, प्लास्टिक शॉपिंग बॅग्स, अन्नाचे डबे आणि अन्य प्लास्टिक कचरा जमा झाल्याचे त्यांनी नमूद




केले. समुद्र आणि नद्यांमध्ये वाढत जाणारा हा कचरा पर्यावरणासाठी अत्यंत चिंताजनक आहे. प्लास्टिकचा कचरा जलचर, पक्षी आणि अन्य जीवसृष्टीसाठी घातक ठरत असून, त्याचा पर्यावरणीय परिणाम दीर्घकाळ जाणवतो. त्यामुळे प्लास्टिक निर्मितीपासून ते त्याच्या वापरानंतरच्या संकलनापर्यंत संपूर्ण साखळीवर प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे.

केवळ पुनर्वापरयोग्य प्लास्टिकच्या उत्पादनाची गरज प्लास्टिक प्रदूषणावर तातडीने उपाय करण्यासाठी बाजारात सहजपणे पुनर्वापर करता येईल अशाच प्लास्टिक वस्तूंच्या उत्पादनाला परवानगी देण्याचा कठोर नियम करण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक वस्तूंची रचना अशी असावी की त्या वापरानंतर भंगार किंवा कचरा वेचकांकडून सहजपणे संकलित करता येतील आणि त्यांना योग्य आर्थिक मूल्य मिळेल.प्लास्टिक कचऱ्याला आर्थिक मूल्य प्राप्त झाल्यास तो रस्त्यावर, नाल्यांमध्ये किंवा जलस्रोतांमध्ये जाण्याऐवजी आपोआप संकलित होऊन पुनर्वापराच्या प्रक्रियेत जाण्यास मदत होईल. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करण्याबरोबरच कचरा संकलन करणाऱ्या घटकांसाठीही उत्पन्नाचा मार्ग निर्माण होऊ शकतो. उत्पादकांबरोबरच विक्रेत्यांचीही जबाबदारी निश्चित करावी प्लास्टिक उत्पादक कंपन्यांवर केवळ पुनर्वापरयोग्य सामग्रीचा वापर करण्याची तसेच वापरानंतर निर्माण झालेल्या प्लास्टिकचे संकलन करण्याची कायदेशीर सक्ती असावी. विस्तारित उत्पादक जबाबदारी (EPR) अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. त्याचबरोबर उत्पादन साखळीतील महत्त्वाचा घटक असलेल्या विक्रेते आणि दुकानदारांवरही वापरलेल्या प्लास्टिक वस्तू ग्राहकांकडून परत स्वीकारण्याची आणि त्या पुनर्वापरासाठी पुढे पाठविण्याची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. उत्पादक, वितरक, विक्रेते आणि ग्राहक या सर्वांची भूमिका स्पष्ट झाल्यास प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक होऊ शकते. जनजागृतीसोबत कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती महत्त्वाची असली तरी ती एकटी पुरेशी ठरणार नाही. प्लास्टिक उत्पादन, विक्री, वापर आणि संकलन या प्रत्येक टप्प्यावर ठोस नियम आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. 'प्लास्टिकला सुयोग्य पर्याय शोधणे आणि पुनर्वापरयोग्य प्लास्टिक उत्पादनाला कायदेशीर चौकट देणे हीच काळाची गरज आहे,' असे पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी स्पष्ट केले. उत्पादक आणि विक्रेते या दोन्ही स्तरांवर जबाबदारी निश्चित करणारा कठोर आणि व्यवहार्य कायदा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. प्लास्टिकचा वाढता वापर आणि त्यातून निर्माण होणारा कचरा ही आजच्या काळातील गंभीर पर्यावरणीय समस्या बनली आहे. प्लास्टिकला टिकाऊपणा, विविध प्रकारच्या वापरातील उपयुक्तता आणि स्वस्त किंमत यामुळे मोठी मागणी आहे. त्यामुळे प्लास्टिकचा वापर केवळ जनजागृतीच्या माध्यमातून पूर्णपणे थांबवणे व्यावहारिकदृष्ट्या कठीण आहे. त्यासाठी प्लास्टिकला सक्षम पर्याय उपलब्ध करून देण्यासोबतच केवळ पुनर्वापरयोग्य प्लास्टिकच्या उत्पादनाला कायदेशीर प्रोत्साहन व सक्ती करणे आवश्यक असल्याचे मत पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी व्यक्त केले.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व गोल्ड सिटी हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | (प्रतिनिधी):** श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, नशिराबाद यांच्या वतीने समाजहिताच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २७ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित या शिबिरात नागरिकांची विविध आजारांसाठी मोफत तपासणी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि गोल्ड सिटी हॉस्पिटल यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात विशेषतः किडनीसंबंधित आजारांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. तसेच आजारांचे निदान, आवश्यक उपचार आणि पुढील वैद्यकीय प्रक्रियेबाबत नागरिकांना योग्य माहिती देण्यात आली. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' आरोग्य हीच खरी संपत्ती असून समाजातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचावी, या उद्देशाने सेवा केंद्राने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. 'सेवा हीच खरी भक्ती' या



भावनेतून श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने सातत्याने विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम राबविले जातात. त्याच सेवाभावी परंपरेतून आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरातून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती शिबिरादरम्यान डॉ. प्रमोद अमोदकर आणि श्री गणेशदादा चव्हाण यांनी भेट देऊन शिबिराची पाहणी केली. केंद्राचे मार्गदर्शक डॉ. तिलकदादा नारखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रात विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. केंद्राचे आधारस्तंभ श्री रोहिदास पाटील काका आणि श्री देविदास पाटील काका यांनी शिबिराला प्रत्यक्ष उपस्थित राहून रुग्णांची विचारपूस केली आणि त्यांच्या आरोग्यविषयक अडचणी जाणून घेतल्या. सेवेकऱ्यांचे परिश्रम आरोग्य तपासणी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नागरिकांमध्ये आरोग्याविषयीकरण्यासोबतच गरजू नागरिकांना प्राथमिक वैद्यकीय मार्गदर्शन उपलब्ध करून देणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला.राबाद यांच्या वतीने समाजहिताच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. २७ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित या शिबिरात नागरिकांची विविध आजारांसाठी मोफत तपासणी करण्यात आली. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि गोल्ड सिटी हॉस्पिटल यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

# धुळ्यात तुफान हाणामारी; व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल!

## दोन्ही गटांकडून नरडाणा पोलिसांत परस्पर तक्रारी

जन सम्राट टाईम्स

**शिंदखेडा | प्रतिनिधी :** शिंदखेडा तालुक्यातील माळीच गावात एका शैक्षणिक संस्थेशी संबंधित विषयावरून दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून,घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. हाणामारीनंतर दोन्ही गटांनी नरडाणा पोलीस ठाण्यात धाव घेत एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्या आहेत. शैक्षणिक संस्थेच्या विषयावरून वाद मिळालेल्या माहितीनुसार, माळीच गावात महेंद्र देसले आणि काही



शिक्षकांमध्ये एका शैक्षणिक संस्थेशी संबंधित विषयावरून वाद झाला. सुरुवातीला झालेल्या शाब्दिक वादाचे रूपांतर पुढे हाणामारीत झाले. यावेळी दोन्ही बाजूंनी एकमेकांना मारहाण केल्याचे व्हायरल व्हिडिओमध्ये दिसून येत असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, हाणामारीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित झाल्याने या घटनेची चर्चा परिसरात सुरू झाली आहे.

दोन्ही गटांकडून परस्पर तक्रारी घटना घडल्यानंतर दोन्ही गटांनी नरडाणा पोलीस ठाणे गाठले. संबंधितांनी एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींच्या आधारे पोलिसांकडून घटनेची चौकशी सुरू करण्यात आली आहे. नेमका वाद कशामुळे झाला आणि हाणामारीची सुरुवात कोणत्या कारणावरून झाली, याचा सखोल तपास नरडाणा पोलीस करत आहेत. तपासानंतरच घटनेमागील नेमके कारण आणि संबंधितांची भूमिका स्पष्ट होणार आहे.

# समीर शेख यांचे क्रिकेट पंच परीक्षेत घवघवीत यश

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर| प्रतिनिधी:** क्रिकेटच्या मैदानावर फलंदाजांच्या चौकार-षटकारांइतकाच पंचांचा अचूक निर्णयही सामन्याचा निकाल ठरवतो. याच निर्णयक्षमतेच्या कठीण परीक्षेत मलकापूरचे युवा क्रिकेट पंच समीर शेख यांनी घवघवीत यश संपादन केले असून, विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय पंचपदी आपली निवड पक्की केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे मलकापूरच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पंचांसमोर गुणवत्तेची कसोटी विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या पंच परीक्षेत समीर शेख यांच्या क्रिकेटविषयक ज्ञानासोबतच क्रिकेटच्या नियमांचे आकलन, निर्णयक्षमता आणि मैदानावरील परिस्थितीचे अचूक निरीक्षण यांची कसून परीक्षा घेण्यात आली. अनुभवी व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच विनीत कुलकर्णी, अभिजीत देशमुख आणि नितीन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या परीक्षेत समीर यांनी आपल्या गुणवत्तेची प्रभावी छाप उमटवली. मलकापूरच्या मैदानावरून विदर्भाच्या मैदानापर्यंतचा प्रवास समीर शेख यांच्या पंचगिरीच्या प्रवासाची सुरुवात तालुका



क्रीडा संकुल, मलकापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावरून झाली. सराव सामन्यांमध्ये पंच म्हणून जबाबदारी पार पाडताना त्यांना या क्षेत्राची गोडी निर्माण झाली. त्यानंतर सातत्यपूर्ण सराव, क्रिकेटच्या नियमांचा सखोल अभ्यास आणि मैदानावरील अनुभवाच्या जोरावर त्यांनी राज्यस्तरीय पंच होण्याचे ध्येय निश्चित केले. पहिल्या अपयशानंतर जिद्दीने यशाला गवसणी विशेष म्हणजे, यापूर्वी झालेल्या पंच परीक्षेत समीर यांना अपेक्षित यश मिळाले नव्हते. मात्र, या अपयशाने ते खचले नाहीत. 'अपयश हा शेवट नसून यशाच्या दिशेने जाणारा एक टप्पा आहे,' या भावनेने त्यांनी पुन्हा नव्या जोमाने तयारी सुरू केली. विदर्भ क्रिकेट संघटनेच्या जिल्हा समितीचे अध्यक्ष नितेश उपाध्याय, जिल्हा क्रिकेट संयोजक किशोर वाकोडे तसेच बुलढाणा जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत साळुंके यांनी त्यांना सातत्याने मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# 'गेट टूगेदर 2026' उत्साहात; स्वच्छता मोहिमेतून 'स्वच्छ पाचगणी, सुंदर पाचगणी'चा संदेश

## सिडनी पॉईंटवर श्रमदानातून १५० किलोहून अधिक कचरा संकलित

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव |प्रतिनिधी:** धरणगाव : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) माजी स्वयंसेवकांचा 'गेट टूगेदर २०२६' स्नेहमेळावा पाचगणी-महाबळेश्वर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. NSSच्या कार्यकाळातील जुन्या आठवणींना उजाळा देतानाच सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची भावना जपत या स्नेहमेळाव्यात स्वच्छता मोहिमेसह योगसत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, सत्कार आणि विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या नियोजन समितीचे अध्यक्ष सय्यद मुस्ताक, खजिनदार विनायक महाजन, सल्लागार डॉ. मुकेश कुलकर्णी, उपाध्यक्ष



सुबोधकुमार पाटील आणि महिला अध्यक्ष मनीषा मानकर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या स्नेहमेळाव्यात NSSचे १५ स्वयंसेवक आणि १० महिला स्वयंसेवक सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात NSS शिबिराच्या धर्तीवर करण्यात आली. सकाळी योगगुरू डॉ. भालचंद्र सर यांच्या मार्गदर्शनाखाली योगसत्र घेण्यात आले. त्यानंतर पाचगणी नगरपरिषद आणि नेस्ले प्रणित 'हिलदरी' अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध सिडनी पॉईंट येथे स्वच्छता व श्रमदान मोहीम राबविण्यात आली.

डॉ. मुकेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी परिसराची स्वच्छता करून तब्बल १५० किलोपेक्षा अधिक कचरा संकलित केला. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनासोबतच पर्यटक आणि नागरिकांना 'स्वच्छ पाचगणी, सुंदर पाचगणी'चा सामाजिक संदेश देण्यात आला. दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रम, सहभागी स्वयंसेवकांचा सत्कार आणि मनोगतांचा कार्यक्रम झाला. शेरो-शायरीच्या माध्यमातून रसिकांना मंत्रमुग्ध करणारे बेताब बादशहा दिलशाद शेख तसेच मनमोहक नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकणाऱ्या 'धकधक गर्ल' कांचन पडळकर यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढली. रात्रीच्या सत्रात किशोर रणदिवे यांच्या सुमधुर गीतांची मैफल रंगली. यावेळी अनेक स्वयंसेवकांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांचे मनोरंजन केले. NSSच्या कार्यकाळातील जुन्या आठवणी, शिबिरातील अनुभव आणि स्वयंसेवकांमधील आपुलकीच्या नात्यांना उजाळा देणारा 'भावबंध' हा कार्यक्रम स्नेहमेळाव्याचे विशेष आकर्षण ठरला. या कार्यक्रमाने उपस्थितांच्या भावविश्वाला स्पर्श केला. संपूर्ण स्नेहमेळाव्यातील आणखी एक विशेष आकर्षण ठरला तो छोटा स्वयंसेवक आर्तरुल गाझी. त्याच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमात आणखी उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

### सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन खजिनदार विनायक महाजन यांनी केले. NSSच्या माध्यमातून रुजलेली सामाजिक बांधिलकी, पर्यावरणप्रेम आणि स्वयंसेवकांमधील भावबंध यांचा सुंदर संगम 'गेट टूगेदर २०२६'च्या निमित्ताने अनुभवायला मिळाला. माजी स्वयंसेवकांच्या या अनोख्या स्नेहमेळाव्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळण्यासोबतच सामाजिक कार्य, पर्यावरण संवर्धन आणि सेवाभावी उपक्रमांची नवी प्रेरणा मिळाली.

# रस्त्याची दुरवस्था; १५ दिवसांत काम न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । प्रतिनिधी :** तालुक्यातील नाडगाव ते सोनोटी रस्त्याची गेल्या दहा वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली असून, मोठमोठ्या खड्ड्यांमुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी सोनोटी येथील रहिवासी सुनील सुभाष बोदडे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बोदवड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मंजुरीनंतरही काम रखडले निवेदनानुसार, नाडगाव-सोनोटी रस्ता सन २०२४ पासून मंजूर असल्याचे सांगण्यात येत असले, तरी अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रस्त्याच्या दुरवस्थेचा फटका विद्यार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे विद्यार्थ्यांची बस वेळेवर येत नसल्याचे तसेच अनेकदा बससेवाही उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे बोदडे यांनी निवेदनात नमूद केले आहे. वारंवार मागणी करूनही दुर्लक्षाचा आरोप रस्त्याच्या दुरुस्तीबाबत संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप सुनील बोदडे यांनी केला आहे. मोठा अपघात घडण्याची प्रतीक्षा न करता प्रशासनाने तातडीने रस्त्याचे डांबरीकरण करून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. १५ दिवसांचा अल्टिमेटम येत्या १५ दिवसांत नाडगाव-सोनोटी रस्त्याची समस्या मार्गी न लागल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर परिसरातील नागरिकांसह बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा सुनील बोदडे यांनी निवेदनातून दिला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग या मागणीची दखल घेऊन रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात करतो, याकडे नाडगाव, सोनोटी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे